महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विदयापीठ मार्ग, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

दुरध्वनी क्र. ०२०-२५६७६८१८, २५५५९२००        Email:- principal.gppune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. शातंनिपु/पवि/२०२१/ १७७        दिनांक 14 JUN 2021

महत्वाचे परिपत्रक (विद्यार्थ्यांसाठी)

विषय – सम सत्र २०२० परीक्षेच्या आयोजनाबाबत

संदर्भ – १. No.GPP/AC/T-E-20/2021/1572 dated 26 March 2021

२. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र जा. क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२१/२०२१/०६८ दिनांक ०१/०६/२०२१

३. दिनांक ०२/०६/२०२१ रोजी विभागप्रमुखांची मा. प्राचार्य समवेत बैठकीत झालेल्या चर्चेनुसार

संस्थेने शैक्षणिक वेळापत्रकाबाबत सर्व विद्यार्थ्यांना संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकाद्वारे (Academic Calendar) कळविले होते. संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकानुसार व संदर्भ क्र. ३ अन्वये संस्थे मार्फत सर्व विद्यार्थ्यांची सम सत्र २०२० ची अंतिम परीक्षा Multiple Choice Question (MCQ) वापरून Online पद्धतीने घेण्यात येईल.

सम सत्र २०२० परीक्षेबाबत ठळक बाबी खालील प्रमाणे आहेत –

१. सर्व विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा Online प्रणालीचा वापर करून तोंडी पद्धतीने घेण्यात येईल.
   १.१ याकरिता विविध meeting applications चा वापर करून प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल.
   १.२ तसे शक्य नसल्यास telephonic पद्धतीने सदर प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल.
   १.३ वरील सर्व प्रयत्नानंतरही विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे शक्य नसल्यास अशा विद्यार्थ्यांचे सत्रकर्म, जर्नल्स, निरंतर मूल्यमापन या आधारे मूल्यमापन करून गुण देण्यात येतील.

२. अभ्यासक्रमातील सर्व विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा Multiple Choice Question (MCQ) वापरून Online पद्धतीने संस्था स्तरावर घेण्यात येईल. सदर परीक्षा विद्यार्थी Smart Mobile Phone/ Laptop/ Tablet/ Desktop इत्यादीचा वापर करून सद्य परिस्थितीत ज्या ठिकाणी वास्तव्यास आहेत त्या ठिकाणाहून देऊ शकतील. **सदर परीक्षेत ४० पैकी ३५ प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.** सदर परीक्षेकरिता विद्यार्थ्यांना ०२ तासाचा Slot देण्यात येईल. त्या Slot मध्ये विद्यार्थ्यांनी Login करून प्रत्यक्ष परीक्षा Start केल्यानंतर ०१ तासाचा कालावधी देण्यात येईल. विद्यार्थ्यांने Exam Start केल्यानंतर परीक्षेच्या कालावधीत कोणत्याही पद्धतीचा गैरमार्ग अवलंबणार नाही याची खातरजमा करण्याकरिता संस्थेने प्राधिकृत केलेल्या पर्यवेक्षकांमार्फत Online Proctoring (Monitoring) करण्यात येईल. Online लेखी परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक Online Proctoring (Monitoring) बाबतच्या सविस्तर सूचना व परीक्षेच्या कार्यप्रणाली बाबतच्या सविस्तर सूचना विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे परिपत्रकाद्वारे देण्यात येतील.

३. ज्या विषयांच्या अभ्यासक्रमात Drawing चा समावेश आहे, त्या विषयांची परीक्षा MCQ वापरून घेणे शक्य नाही. सदर विषयांची परीक्षा सत्रकर्म / अभ्यासक्रमावर आधारित सादरीकरणाद्वारे Online पद्धतीने घेण्यात येईल. सदर सादरीकरण तसेच तोंडी प्रश्नोत्तरांच्या आधारे परीक्षक मुल्यांकन करतील. Drawing असलेल्या विषयांची परीक्षा

विभाग स्तरावर दिनांक ०१/०७/२०२१ ते ०७/०७/२०२१ या कालावधीत घेण्यात येईल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

४. परीक्षेबाबतचे ठळक वेळापत्रक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे –

| Activity | Schedule |
|---|---|
| Practical / Oral Examination | 28 June 2021 – 07 July 2021 |
| Theory Examination | From 8 July 2021 onwards |

५. लेखी परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक लवकरच संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

परीक्षा नियंत्रक,
परीक्षा विभाग
शासकीय तंत्रनिकेतन पुणे

प्रत – १. मा. प्राचार्य यांना माहितीस्तव सविनय सादर
२. सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की त्यांनी यासंबंधी विद्यार्थ्यांना अवगत करावे.
३. संगणक विभागप्रमुखांमार्फत संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी